India Media Monitor

# Prahar

## \'Save The Doctor\'

**Date: 31/07/2013 | Edition: Mumbai | Page: 2 | Source: Bureau | Clip size (cm): W: 8 H: 12**

**Clip: 1 of 1**

# डॉक्टरांच्या जागांसाठी ‘सेव्ह दि डॉक्टर’

▶ मुंबई *(प्रतिनिधी)*

देशातील मेडिकल विभागातील तज्ज्ञांच्या कमतरतेचा मुद्दा अधोरेखित करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) व असोसिएशन ऑफ हेल्थकेअर प्रॉवायडर्स इंडिया (एएचपीआय)यांच्या वतीने सोमवारपासून देशभर ‘सेव्ह दि डॉक्टर्स’ ही चळवळ सुरू करण्यात आली आहे. पदवी तसेच पदव्युत्तर शिक्षणासाठी असणाऱ्या मेडिकलच्या जागांमध्ये समानता यावी, हा या चळवळीचा मुख्य उद्देश आहे. मेडिकलच्या विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात नियुक्ती आणि पदव्युत्तर प्रशिक्षणाची सोय करावी, अशी मागणी या संस्थांनी केली आहे. संपूर्ण देशभरातून सुमारे दोन ते तीन लाख मेडिकलचे विद्यार्थी या चळवळीत सहभागी झाले आहेत.

पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी कमी जागा असल्यामुळे देशातील अनेक विभागांत डॉक्टरांची कमतरता जाणवते. मेडिकल विभागाच्या कोणत्याही भागातून पदव्युत्तर शिक्षण घेणे खूप महत्त्वाचे आहे. भारतात मेडिकलच्या अनेक संस्था आहेत. मात्र, जागांच्या अभावी येथे समस्या निर्माण होत आहेत. ज्येष्ठ डॉक्टर्स निवृत्तीच्या मार्गावर असताना नव्याने रुजू होणाऱ्या डॉक्टर्सना १३ वर्षे सरावासाठी द्यावी लागतात. अशा वेळी डॉक्टरांची कमतरता निर्माण होत आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थींना ग्रामीण भागात रुजू करा, अशी मागणी या संस्थांनी केली आहे.